MHSO100002162013

## नि.दि.दा.क्र.५३/२०१३ मधील निशाणी क्र.२१९ खालील आदेश

वादींनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.७ अशोक जगन्नाथ दुरापे व प्रतिवादी क्र.१३ सर्जेराव पंढरीनाथ दुरापे याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.७ अशोक जगन्नाथ दुरापे हा ता.११.०१.२०२४ रोजी व प्रतिवादी क्र.१३ सर्जेराव पंढरीनाथ दुरापे हा ता.२२.०१.२०२५ रोजी मयत झाला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.७ व १३ यांच्या नावापुढे मयत असे लिहिण्यासाठी व प्रतिवादी क्र.७ व १३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी क्र.७ व १३ हे मयत झाल्याचे व त्यांचे वारस वादींना माहित नसल्यामुळे त्यांना प्रतिवादींचे वारस अभिलेखावर घेता आले नाहीत. प्रतिवादी क्र.७ चे वारस अभिलेखावर घेण्यास ०१ वर्ष, ०५ महिने व १४ दिवसांचा व प्रतिवादी क्र.१३ चे वारस अभिलेखावर घेण्यास ०७ महिने व ०४ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब जाणीवपुर्वक झालेला नाही. त्यामुळे सदरचा विलंब माफ करणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी नि.क्र.२२५ वर जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन त्याबाबत योग्य व संयुक्तीक कारण दिले नाही. प्रतिवादी क्र.७ व १३ चे वारस ९० दिवसांच्या आत अभिलेखावर न घेतल्यामुळे सदरचा दावा त्यांच्याविरुध्द अवसान झालेला आहे. प्रतिवादी क्र.७ व १३ हे मयत झाल्याबाबत वादींना माहिती होती. वादींनी जिल्हा न्यायालयातील किरकोळ दिवाणी अपील क्र.३३/२०१५ मध्ये सदरचे मयतांचे वारस अभिलेखावर घेतले आहे. सदरचा अर्ज कायदेशीर नाही व त्यामुळे तो रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे... आवश्यक आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय? ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री.कदम व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.फडे यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.७ हा ता.११.०१.२०२४ रोजी व प्रतिवादी क्र.१३ हा ता.२२.०१.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. त्यानंतर ता.२५.०९.२०२५ रोजी वादींनी सदरचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी क्र.७ व १३ चे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब का झाला याबाबतचे संयुक्तिक स्पष्टीकरण वादींतर्फे देण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

### मुद्दा क्र.२ बाबतः–

५. मी वर नमूद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

सदरचा निशाणी क्र.२१९ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2025.10.04 10:19:18 +0530

ता.०३.१०.२०२५. (सो.द.घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माळशिरस.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा ता.०३.१०.२०२५.

न्यायनिर्णय टंकलिखित केलेला ता.०३.१०.२०२५.

न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा ता.०३.१०.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याचा ता.०४.१०.२०२५.

स्वाक्षरीत/–

ता.०४.१०.२०२५.

(श्री.म.पां.सदाफुले)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.